# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail - dy.registrar.tau@fort.mu.ac.in

**Teaching Appointments & Approval Section**
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32


संदर्भ क्र. टीएएस(विशि)/आयसीडी/१७-१८/७

Date : 13th August, 2019

**परिपत्रक :**

**विषय : विद्यापीठ शिक्षकांच्या संगणकीय नोंदणीबाबत......**

**संदर्भ : परिपत्रक क्र.संलग्नता/आयसीसी/२०१७-१८/०३, दिनांक २८ एप्रिल, २०१७**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख / संचालक तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / संस्था यांचे प्राचार्य तथा संचालक यांना कळविण्यात येते की, विद्यापीठातील सर्व शिक्षकांच्या नियुक्ती / पदोन्नती / मान्यता या सर्व संबधीची संपुर्ण प्रक्रिया संगणकाच्या माध्यमातून Online प्रणाली द्वारे सुरु करण्यात आल्या आहेत. सदर बाब आपणांस विद्यापीठाच्या उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाद्वारे या अगोदरच कळविण्यात आली आहे. मात्र अद्यापही अनेक महाविद्यालये तसेच विभाग प्रमुखांनी सदर प्रक्रियेसाठी शिक्षकांची नोंदणी केलेली नसल्याचे निर्दशनास आले आहे.

सदर Online प्रणालीमध्ये महाविद्यालयांच्या तपासणीसाठी जाणा-या विविध समिती ( LIC ) / शिक्षक निवडीसाठी निवड समित्या ( Selection Commiittee ) / आश्वासित प्रगती योजनेसाठी तज्ञ समित्या ( Expert Committee ) / तसेच मा. कुलगुरुंचे प्रतिनीधी अशा विविध समित्यांवर नामनिर्देशन करणे, समित्यांचे अहवाल स्विकारणे, अहवालास मान्यता देणे व पात्र शिक्षकांना मान्यता पत्र देणे, इत्यादी सर्व कार्यवाही संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून ऑनलाईन प्रक्रियेद्वारे केली जाणार आहे. यासाठी विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख/प्राचार्य तथा संचालक यांनी आपआपल्या विभागातील/महाविद्यालयातील/संस्थेतील नियमित शिक्षकांचे Login Id या प्रणालीद्वारे प्रदान करणे अनिवार्य आहे. तसेच यापुढे सर्व पत्र व्यवहार शिक्षकांच्या सदर Login Id मध्येच उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे विभागातील सर्व नियमित शिक्षकांची नोंदणी होणे आवश्यक आहे याची कृपया घ्यावी. त्या अनुषंगाने नियमित शिक्षकांचे Login Id साठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ) https://muonline.org.in या संकेतस्थळाला भेट द्यावी व Affiliation Section या टॅबला क्लीक करावे.
क) तेथील College information या टॅबला व त्यातील Teaching Staff या लिंकवर क्लीक करावे.
ड) Teaching Staff Section मधील Manage Teaching Staff या लिंक चा वापर करुन नियमित शिक्षकांचे आयडी त्यांना प्रदान करावेत.
इ) आपल्या महाविद्यालयातील/विभागातील/संस्थेतील निवृत्ती शिक्षकांची माहिती Delete करण्यात यावी. यासाठी त्यांच्या नावापुढे [ x ] ही कळ दाबावी.
फ) तसेच नव्याने नियुक्त झालेले शिक्षक किंवा आश्वासित प्रगती योजनेद्वारे (CAS) पदोन्नती मिळाल्यामुळे वरील पदावर कार्यरत शिक्षक यांची माहिती अद्यायावत ( update ) करावी.

उपरोक्त प्रक्रियेद्वारे आपआपल्या महाविद्यालयातील / विभागातील / संस्थेतील फक्त नियमित शिक्षकांची ( Regular Teachers ) नोंदणी करावी. तात्पुरते शिक्षक, (Ad-hoc) शिक्षक, तासिका तत्वावरिल शिक्षक, अभ्यागत (Visiting) शिक्षक, ६ महिने किंवा ११ महिने कालावधी (Tenure) तत्वावरील नियुक्त झालेले शिक्षक यांची नोंदणी करण्यात येऊ नये, याची कृपया नोंद घ्यावी.

केवळ ऑनलाईन नोंदणी तसेच शिक्षक नियुक्ती व मान्यता या संबधित माहितीसाठी संकेतस्थळावर "Contact US" टॅब मध्ये Helpline No. ०७७२२०६५२८३, ०७७२३०६५२८४ व ईमेल support@muonline.org.in देण्यात आले आहेत या संपर्क क्रमांकावर संपर्क करावा.

( दत्ता घुगे )
उपकुलसचिव